# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०७/ २०१२** **दिनांक ०९.०५.२०१२**

**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- सायंकाळी ०६.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा बुधवार दि.०९.०५.२०१२ रोजी सायंकाळी ६.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात (साईनिवास अतिथीगृहात) आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-५६२-२०१२,दिनांक ०८ मे,२०१२ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा बुधवार दि.०९.०५.२०१२ रोजी सायंकाळी ६.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष

०२. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य

०३. श्री.किशोर मोरे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं. ०१** **सन २०१२-१३ मध्ये प्रसादालय, मंदिर, कँटीन या विभागांसाठी चार महिन्याकरीता किराणा माल, तांदूळ, गावरान तुप, गहू, खिसमिस,भाजीपाला खरेदीबाबत/ एक महिन्यासाठी मागील दराने किराणा माल व आवश्यक खाद्यतेल, वनस्पती तूप व हरबरा दाळ कोटेशन्स मागवून तातडीने खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१२-१३ साठी प्रसादालय व कॅन्टीन विभागासाठी आवश्यक किराणा माल व तांदुळ वार्षिक दराने खरेदीकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४.०१.२०१२ रोजी झालेल्या सभेमध्ये निर्णय क्र.१६५ अन्वये तत्वतः मान्यता मिळालेली होती. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा विक्री करणेत आली. किराणा मालासाठी प्राप्त ४२ निविदांसोबतचे लिफाफा क्र.२ मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे मान्यतेने दि.०५.०३.२०१२ रोजी मा.उप कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आलेला आहेत. त्यानंतर पात्र ठरलेल्या निविदाधारकांनी निविदेसोबत दिलेले मालाचे नमुने दि.१०.०३.२०१२ रोजी मा.व्यवस्थापन मंडळाचे उपसमितीचे सभेत निवडण्यात आले. त्यास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५.०३.२०१२ रोजी मान्यता देण्यात आली. दरम्यानन व्यवस्थापन समितीमध्ये बदल झाल्याने नमुने निवडलेल्या पुरवठाधारकांना मा.त्रिसदस्य समितीचे दि.०६.०४.१२ रोजीचे सभेत चर्चा वाटाघाटीसाठी बोलविण्यात येऊन त्यांचे मुळ निविदा (लिफाफा क्र.१) उघडून, त्यांचेशी दरांबाबत चर्चा वाटाघाटी करण्यात आलेली आहे. सदर प्रक्रियेतील न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेकामी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील दि.१३.०३.१२ चे आदेशान्वये मा.उच्च न्यायालयात मान्यतेसाठी सादर केला असता, त्यांनी दि.०५.०५.१२ रोजी उपरोक्त खरेदीकामी खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

अ) सन २०१२-१३ सालाचे चार महिन्यांकरिता नॅशनल दोन व लोकल दोन वर्तमानपत्रात जाहिरात देऊन फेरनिविदा मागविण्यात याव्यात.

ब) चार महिन्यासाठी खरेदीची प्रक्रिया पुर्ण होईपावेतो २०११-१२ चे मंजुर दराने किराणा माल खरेदी करावा.

त्यानुसार चार महिन्याकरिता आवश्यक असलेल्या किराणा मालाचा तपशिल सोबतच्या परिशिष्ठ अ, ब, क मध्ये नमुद केला आहे. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे-

**अ) मोंढयावरुन जाहिर लिलाव पध्दतीने खरेदी...**

| | | | |
|---|---|---|---|
| गहू - | ४,३३३ क्विंटल | मेथी- | ०.८३ क्विंटल |
| हरबरा- | ३६६ क्विंटल | सफेद तीळ- | ३.०० क्विंटल |
| खिसमिस- | ७५ क्विंटल | मोहरी- | १६.०० क्विंटल |
| भाजीपाला - | आवश्यकतेनुसार अंदाजे खर्च रु.३०,००,०००/- | | |

सन २०१२-१३ मधील चार महिन्यांकरीता गहू, हरभरा, मेथी व सफेद तिळ इ.ची खरेदी कृषी उत्पन्न बाजार समितीचे कोपरगाव, राहाता, कोल्हार इ.ठिकाणच्या मोंढयावरून जाहिर लिलाव पध्दतीने करणेस तसेच प्रसादालयासाठी आवश्यक खिसमिस कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पिंपळगांव बसवंत, तासगांव, सांगली पंढरपूर येथील मोंढयावरून जाहीर लिलावाने खरेदी करणेस तसेच मे.प्रवरा फळे, भाजीपाला खरेदी विक्री व प्रक्रिया शेतकरी सहकारी संस्था मर्यादित, प्रवरानगर यांचेकडील नमुने पाहून खरेदी करणेस व प्रसादालयाचे दैनंदिन वापराकरीता आवश्यक भाजीपाला कृषी उत्पन्न बाजार समिती कोपरगांव, शिरडी, सावळीविहीर, राहाता इ. ठिकाणचे मोंढयावर जाहीर लिलावाने खरेदी करणेस मान्यता असावी. तसेच महाबीज कडून सन २०१२-१३ वर्षासाठी १०,००० क्विंटल गहु खरेदी करावयाचा झाल्यास त्यास प्रती क्विंटल रु.१,३३०/- प्रमाणे वार्षिक रु.१,३३,००,०००/- (एक कोटी तेहतीस लाख) मात्र खर्च अपेक्षित आहे, मोंढया व्यतिरिक्त आवश्यक गहु महाबीजकडून घेणस मान्यता असावी.

**ब) कोटेशन मागवून खरेदी..साखर ३५०० क्विंटल (एम ३०/एस ३० ग्रेड)**

प्रचलित पद्धतीप्रमाणे अ.नगर जिल्हयातील कोपरगांव, राहाता व श्रीरामपूर तालूक्यातील साखर कारखान्याकडून तसेच संस्थान वाहनाने वाहतूक अशा दराचे टेंडर मागवून व वाहतुक खर्चाबाबत शहानिशा करून खरेदीस अथवा एकच कोटेशन प्राप्त झाल्यास त्यांचे मान्य दराने खरेदीस मान्यता असावी.

**क) जाहिर निविदा मागवून खरेदी..**

**०१. किराणा माल, कडधान्ये व मसाल्याचे पदार्थ (चहा, बिस्कीटे, बाटली बंद पाणी, दुध इ.)**

प्रसादालयाचे दैनंदिन वापरासाठी लागणारा किराणा माल, कडधान्ये व मसाले पदार्थ इत्यादी खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देउन निविदांची विक्री करून ठराविक मुदतीत निविदा व मालाचे नमुने मागवून, मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेमध्ये नमुने निवडून, संबंधितांना समक्ष चर्चेसाठी बोलावून त्यांनी दिलेल्या सुट दरांचा विचार करुन तसेच नमुने पाहून अंतिम निर्णय घेऊन खरेदी करणेस मान्यता असावी. तसेच गोडा मसाला आवश्यकतेनुसार बचतगटांकडून नमुने व दर यांचा विचार करुन खरेदी करणेस मान्यता असावी.

**०२. तांदुळ- ३००० क्विंटल (जुना)** (सोना मसुरी आंध्रा)

प्रसादलयासाठी आवश्यक असणाऱ्या तांदुळ एकाचवेळी खरेदी केला जातो. दर्शविलेला तांदुळ चार महिन्यासाठी आहे. तरी निविदेमध्ये तांदुळ समाविष्ट करुन खरेदी करणेस मान्यता असावी.

**०३. गावरान तूप- २४३३ क्विंटल**

प्रसादालयामध्ये प्रसाद लाडू तयार करणेकामी व मंदिरात श्री सत्यनारायण प्रसाद (शिराप्रसाद) बनविणेकामी आवश्यक असणारे गावरान तूप निविदा मागणी करून खरेदी करणेस मान्यता असावी.

**०४. गाय दूध - दररोज अंदाजे ३४०० लिटर**

कॅन्टीन विभागाचे दैनंदिन वापरासाठीचे होमानाईज्ड/पश्चराईज्ड गाय दूध/टोन्ड दुध ३.५ ते ३.८ फॅट व ८.५ एसएनएफ गुणवत्तेचे दूध खरेदी कामी निविदा मागविणेस मान्यता असावी.

सन २०१२-१३ चे प्रथम चार महिन्यांकरीता आवश्यक किराणा मालासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

i) मोंढयावरुन लिलाव पद्धतीने करावयाची खरेदी — रु. १,१७,८२,५००/-
(गहु, हरबरा, मोहरी, सफेद तिळ, खिसमीस, भाजीपाला)

ii) कारखांन्याकडून कोटेशन मागवून करावयाची खरेदी (साखर) — रु. १,६३,३३,३३३/-

iii ) निविदा मागवून करावयाची खरेदी — रु. १५,३१,०८,९४५/-
(किराणा, गावरान तुप, तांदुळ)

----------------------

**एकुण अंदाजे किंमत रु. १८,१२,२४,७७८/-**

सन २०१२-१३ चे चार महिन्यांकरिता खालीलप्रमाणे उलाढालीबाबत निकष देवून मागणी करावी असे नम्र मत आहे.

| **अ.नं.** | **तपशिल** | **संस्थानला करावयाची अंदाजे खरेदीची रक्कम** | **पुरवठाधारकाची अपेक्षित वार्षिक उलाढाल** |
|---|---|---|---|
| ०१. | किराणामाल-दाळी, कडधान्ये व इतर | ६,५२,८४,११६/- | रु.५०,००,०००/- |
| ०२. | तांदुळ | ८०,५०,०००/- | रु.५०,००,०००/- |
| ०३. | खादयतेल (सुर्यफूल/मका ) | ९३,३३,३३३/- | रु.५०,००,०००/- |
| ०४. | गावरान तूप | ७,९०,८३,३३३/- | रु.१,००,००,०००/- |
| ०५. | चहा व कॉफी | १६,११,८३३/- | रु.१०,००,०००/- |
| ०६. | गाय दुध | ७५,००,०००/- | रु.१,००,००,०००/- |
| ०७. | बिस्कीटे | ३९,८१,६६५/- | रु.२०,००,०००/- |
| ०८. | पॉलिकप | १७,१०,०००/- | रु.२०,००,०००/- |
| ०९. | प्लॅस्टीक पिशवी | २६,३९,१६६/- | रु.५०,००,०००/- |
| १०. | मिनरल वॉटर | १८,८९,६६५/- | रु.१०,००,०००/- |

**ड)** उपरोक्त खरेदीची प्रक्रिया पुर्ण होईपावेतो सन २०११-१२ चे मंजुर दराने अंदाजे ०१ महिन्याकरिता किराणा माल खरेदीस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४,५५,५६,१९५/- (चार कोटी पंचावन्न लाख छपन्न हजार एकशे शहान्नव) यातून मोंढ्यावरुन खरेदी करावयाचे गहु, हरबरा, खिसमिस, भाजीपाला व कारखान्याकडून कोटेशन मागवून खरेदी करावयाची साखर याकामी येणारा खर्च रु.७२,७८,९५८/- मात्र वगळता रक्कम रु.३,८२,७७,२३७/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**इ)** वनस्पती तुप, खाद्यतेल (सुर्यफुल/मका), हरबरादाळ इ. (रु.५५,१६,६६७/-) माल पुरवठाधारक सन २०११-१२ चे मंजुर दराने देण्यास तयार नसल्यामुळे जाहिरात देऊन निविदा मागावून, न्युनतम दरधारकाकडून ०१ महिन्याकरिता माल खरेदी करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१२-१३ मध्ये ०४ महिन्यांकरिता प्रसादालय, मंदीर व कॅन्टीन करिता आवश्यक असणारा किराणा माल खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, निविदा मागविण्यात याव्यात. तसेच ४ महिने खरेदीची प्रक्रिया पूर्ण होईपावेतो गहू, हरभरा, खिसमिस, भाजीपाला मोंढ्यावरुन लिलाव पद्धतीने व साखर अहमदनगर जिल्हयातील कोपरगांव, राहाता व श्रीरामपूर तालूक्यातील साखर**

**कारखान्यांकडून कोटेशन मागवून खरेदी करण्यात यावी. साखरेचे एकच कोटेशन प्राप्त झाल्यास त्याच मान्य दरात खरेदी करण्यात यावी.**

**तसेच,उपरोक्त खरेदीची प्रक्रिया पूर्ण होईपावेतो अंदाजे एक महिन्याकरीता प्रसादालयास आवश्यक असणारा किराणा माल सन २०११-१२ चे मंजूर पुरवठाधारकांकडून मागील मंजूर दरानेच खरेदी करावा. तसेच हरभरा डाळ,खाद्यतेल,वनस्पती तूप इ. सन २०११-१२ मधील माल पुरवठादारांकडून पुर्वीच्याच मान्य दराने खरेदी करण्यात यावेत. त्यांनी मागील दराने माल देण्यास नकार दिल्यास स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात देऊन एक महिन्यासाठी आवश्यक मालाकरीता निविदा मागवून निम्नतम दराने खरेदी करण्यात यावी,असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

---

**विषय नं.०२. वनस्पती तूप खरेदीबाबत प्राप्त कोटेशन्स उघडून निम्नतम दर धारकास पुरवठा आदेश देणे बाबत.**

**प्रस्ताव-** सन २०११-१२ चे वनस्पती तुपाचे पुरवठाधारक मे. सचिन ट्रेडर्स, कोल्हार यांनी पुरवठा आदेशात नमुद केलेल्या परिमाणापेक्षा जादा वनस्पती तुपाचा पुरवठा केलेला आहे. पुढील पुरवठा करणेबाबत त्यांचेकडे दूरध्वनीवरुन चर्चा केली असता त्यांनी माल पुरवठा करण्यास नकार दिला आहे. सन २०१२-१३ सालासाठी खरेदी करावयाचे किराणा माल खरेदीबाबतचे प्रस्तावावर अद्याप निर्णय झालेला नाही.

प्रसादालयामध्ये बर्फी, शिरा, शेवया वगैरे बनविण्यासाठी तसेच साबूदाना खिचडी वगैरेसाठी वनस्पती तुपाचा वापर केला जातो. अधिक्षक, प्रसादालय यांनी प्रसादालयासाठी दरमहा साधरण ३० क्विंटल वनस्पती तूपाची आवश्यकता भासते, सध्या वनस्पती तुप शिल्लक नसल्याने तातडीने ३० क्विंटल वनस्पती तुप खरेदी करणेबाबत कळविले आहे.

खरेदी विभागाकडील दि.३०.०४.२०१२ रोजीचे प्रस्तावनुसार नियमीत पुरवठाधारकांकडून दरपत्रके मागवून ३० क्विंटल वनस्पती तुप खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,५२,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख बावन्न हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार दि.०२.०५.२०१२ रोजी संस्थानचे नियमीत पुरवठाधारक यांना ३० क्विंटल वनस्पती तुप खरेदीबाबत दुरध्वनीवरुन दरपत्रके देणेबाबत कळविण्यात आले होते. दि.०४.०५.२०१२ अखेर पुरवठाधारकांनी दिलेल्या दरपत्रकाचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| ०१. | मे.डी.जे.ॲण्ड सन्स, पुणे | १५७८/०३.०५.२०१२ |
| ०२. | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, ना.रोड | १५७९/०३.०५.२०१२ |
| ०३. | मे.सचिन ट्रेडर्स, कोल्हार | १५८०/०३.०५.२०१२ |
| ०४. | मे.रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कंपनी, नाशिक | १६३३/०४.०५.२०१२ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली कोटेशन आजचे समक्ष उघडण्यात आले असता, कोटेशनसादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केल.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशनमध्ये देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|
| ०१. | मे.डी.जे.ॲण्ड सन्स, पुणे | ८३.३३ व्हॅटसह |
| ०२. | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, ना.रोड | ८०.०० व्हॅटसह |
| ०३. | मे.सचिन ट्रेडर्स, कोल्हार | ८४.०० व्हॅटसह |
| ०४. | मे.रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कंपनी, नाशिक | ८३.३३ व्हॅटसह |

उपरोक्त तक्त्यानुसार मे.जयहिंद किराणा स्टोअर्स,नाशिकरोड यांचे दर निम्नतम आहेत, तसेच दूरध्वनीवरुन त्यांनी दरात आणखी सूट देऊन, मागील दराने, म्हणजे रुपये ७६.६५ प्रती किलो (व्हॅटसह)या दराने वनस्पती तूप देण्याची तयारी दर्शविली आहे.

**निर्णय क्र.३९४ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.जयहिंद किराणा स्टोअर्स,नाशिकरोड,यांचा प्रति किलो रुपये ७६.६५ (व्हॅटसह) हा निम्नतम दर स्विकारणेत येऊन,त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा,असें ठरलें.**

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०१ गुंतवणूकी विषयी निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** माहे मे, २०१२ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | युनियन बँक ऑफ इंडीया | ०२/०५/२०१२ | २२,३५,५४,८६७/- |
| ०२ | युनियन बँक ऑफ इंडीया | १३/०५/२०१२ | ५,५८,८८,७१९/- |
| ०३ | बँक ऑफ बरोडा, नाशिक | २७/०५/२०१२ | ३,३०,५६,२७३/- |
| ०४ | विजया बँक, शिर्डी | २७/०५/२०१२ | ३,३०,५६,२७३/- |
| ०५ | दैनंदिन खर्च वजा जाता माहे मे- २०१२ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | १०,००,००,०००/- |

| | |
|---|---|
| एकूण रक्कम रुपये | ४४,५५,५६,१३०/- |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम रु. ४४.५५ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणाऱ्या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

१) आंध्र बँक, शिर्डी
२) बँक ऑफ बरोडा, नासिक
३) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
४) कॅनरा बँक, शिर्डी
५) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
६) कॉर्पोरेशन बँक, शिर्डी
७) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
८) युको बँक, शिर्डी
९) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
१०) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
११) विजया बँक, शिर्डी
१२) युनायटेड बँक ऑफ इंडीया, शिर्डी

तरी अ.नं. १ ते १२ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु. ४४.५५ कोटीची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी मा.त्रिसदस्य समितीच्या सभेत निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.३९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन,दैनंदिन व इतर आवश्यक खर्च वजा जाता गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणारी रक्कम रु.४४.५५ कोटी वरीलप्रमाणे अ.नं.०१ ते १२ बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२.** **श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१२ साजरा करणेस व त्यास येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन सन २००४ च्या अधिनियम क्र.१४ च्या कलम नं. १७(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे. "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संथान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे. ही समितीची कर्तव्ये असतील. "

त्याप्रमाणे रुढी परंपरेनुसार धार्मिक पूजा विधी, उत्सव साजरे केले जातात.

सालाबाद प्रमाणे यावर्षी श्री गुरुपौर्णिमा उत्सव सोमवार दिनांक ०२/०७/२०१२ ते बुधवार दिनांक ४/०७/२०१२ असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचा मुख्य दिवस मंगळवार दिनांक ०३/०७/२०१२ आहे.

**या उत्सवासाठी पुढील प्रमाणे तयारी करावी लागणार आहे.**

| अ.नं. | तपशील | उत्सवात करावयाची कामे |
|---|---|---|
| ०१. | उत्सव निमंत्रण पत्रिका | संस्थानचा कारभार चालविणेसाठी तयार करण्यात आलेल्या योजनेच्या तरतुदीमध्ये दुरुस्ती झाल्याप्रमाणे भक्त मंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतात.<br>यंदाचे श्री गुरुपौर्णिमा उत्सवात सभासदांची वाढती संख्या धरुन १ लाख ६१ हजार तसेच सन्माननीय पाहुण्यांसाठी १,२०० पाकीटांसह निमंत्रण पत्रिका छपाई करुन घ्याव्या लागतील. तसेच नेहमी प्रमाणे प्रेस नोट( न्यूज ॲटम) म्हणून वर्तमान पत्रातून प्रसिध्दी देण्यात येईल. |
| ०२. | उत्सव व्यवस्था- | **अ) कलाकार कार्यक्रम :-** |
| | **सोमवार, दि.२/०७/२०१२ (प्रारंभ दिवस)** | सायंकाळी ७.३० ते रात्रौ. १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम साईनगर मैदान स्टेजवर |
| | **मंगळवार, दि.०३/०७/२०१२ (मुख्य दिवस)** | १) सायंकाळी ०७.३० ते रात्रौ. १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर.)<br>२) रात्री ११.०० ते सकाळी ०५.०० पर्यंत (०३/०७/२०१२) इच्छुक कलाकारांचा साईभजन कार्यक्रम होईल. यादिवशी समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | **बुधवार,दि. ०४/०७/२०१२ (सांगता दिवस)** | सायंकाळी ०७.३० ते १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर)उत्सवांचे तीनही दिवसाकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम ठरावयाचे आहेत.<br>**इच्छूक कलाकारांची पत्रे व तक्ता नंतर सादर केला जाईल.** |
| | | **ब) कीर्तन कार्यक्रम** |
| | सोमवार २/७/२०१२ | श्री गुरुपौर्णिमा उत्सवासाठी तीन दिवस कीर्तन कार्यक्रम ठेवावयाचा आहे. निमंत्रीत |

| | | |
|---|---|---|
| | मंगळवार ३/७/२०१२<br>बुधवार ४/७/२०१२ | कीर्तनकारांची व कलाकारांची निवास व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे व कलाकारांचे मानधन मंदिर विभागामार्फत अदा करण्यात येईल. **किर्तनकार निश्चीती करावयाची आहे.** |
| **०३.** | **श्रीसाईसत्यव्रत (सत्यनारायण ) पूजा व अभिषेक पूजा** | उत्सवकाळात दि.२/०७/२०१२ ते दि. ४/०७/२०१२ अखेर श्री साईसत्यव्रत पूजा व अभिषेक पूजा **बंद** राहतील. |
| **०४)** | **विद्युत रोषणाई** | समाधी मंदिर, द्वारकामाई , चावडी, गुरुस्थान व मंदिर परिसरात सोईप्रमाणे विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री गुरुपौर्णिमा उत्सवात श्री साईराज डेकोरेटर्स,मुंबई विनामुल्य रोषणाई करीत असतात. त्यांची शिर्डी येथे निवास, भोजन व चहा-नाष्ट्याची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येते. मात्र ट्रक भाडे व जाणे - येण्याचा खर्च देण्याची प्रथा आहे. यावेळी विद्युत विभागामार्फत त्यांना दि.१७/४/२०१२ रोजी पत्र देण्यात आलेले आहे. ते न आल्यास संस्थान मार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. |
| **०५.** | **अखंड पारायण व्यवस्था** | उत्सव काळात दिनांक २/०७/२०१२ रोजी सकाळी ०५.१५ वाजता श्री द्वारकामाई मंदिरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल.<br>दि. ३/०७/२०१२ रोजी सकाळी ०५.०० वाजता त्यांची समाप्ती होईल. मा.त्रिसस्य समितीचे ३ सदस्य पहिले तीन अध्याय वाचतील व राहिलेले ५० अध्याय प्रत्येकी एक असे ५० भक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नांवे दिनांक १/०७/२०१२ रोजी अनाऊंसमेंट सेंटर मधील मंदिर कर्मचा-याकडे नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणा करीता नांवे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल. या उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता त्रिसदस्य समितीचे सदस्य राहातील. तसेच श्री रामनवमी उत्सव सन २०१२ मध्ये पोथी, विणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा घेतलेल्या मा. त्रिसदस्य समितीचे सदस्याचे नावाचा तक्ताही सोबत जोडलेला आहे. |
| **०६)** | **पालखी व रथ मिरवणूक** | उत्सवाचे पहिले दिवशी सोमवार दिनांक २/०७/२०१२ रोजी श्रींचे पालखीची गांवातून रात्रौ ९.१५ वाजता मिरवणूक होईल, मंगळवार दिनांक ३/०७/२०१२ रोजी रात्रौ ०९.१५ वाजता रथाची गांवातून मिरवणूक होईल. |
| **०७)** | **संरक्षण व्यवस्था** | उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपणचे परवानगीबाबत मा.पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल. |
| **०८)** | **प्रसाद - भोजन व्यवस्था** | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टांन्नासह रुपये १०/- या दराने भक्तांना प्रसाद भोजन दिले जाते.मा.त्रिसदस्य समितीचे सदस्यांचे कुटुंबिय व नातेवाईक तसेच इतर सन्माननीय व्यक्तींना व निमंत्रीत कलाकरांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीस येणा-या व्यक्तींची प्रसाद भोजन व्यवस्था नेहमीप्रमाणे करण्यात येईल. साईभक्तांचे सोईसाठी अन्नपाकिटे, चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादी कॅन्टींनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टांन्न प्रसाद - नेहमीचे दराने देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी चालू करावी लागतील. तशी व्यवस्था करण्यात येईल. तसेच श्री रामनवमी उत्सवात पालखीधारकांना आलेल्या दिवशी एकवेळचे जेवण संस्थानमार्फत कुपन्स वाटुन दिले होते, त्यानुसार श्री गुरुपौर्णिमा उत्सवात येणा-या पालखीधारकांना एकवेळचे जेवण संस्थानमार्फत कुपन्स वाटुन द्यावयाचे आहे. श्री रामनवमी उत्सवात सन २०१२ तिनही दिवसाचे मिष्टांन्न पदार्थ पुढील प्रमाणे ठेवण्यात आले होते.<br>०१) प्रथम दिवस - शिरा (०२) मुख्य दिवस - जिलेबी (०३) सांगता दिन - बुंदी<br>**या उत्सवात देखील यानूसार तीन दिवस तीन मिष्टांन्न देण्यात येतील.** |
| **०९)** | **लिलाव** | श्रींना अर्पण केलेली वस्त्रे व इतर वस्तूंची प्रसाद रुपाने जाहिर लिलावाने विक्री तीनही दिवस करण्यात येईल. |
| **१०)** | **देणगी काऊंटर्स** | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदिर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊटर्स तीन शिफ्टमध्ये ठेवण्यात येतील. |
| **११)** | **जादा कंत्राटी कर्मचारी** | उत्सवाचे पूर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता लागणा-या जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यास नेमण्यात येईल. याकामी मा.कार्यकारी अधिकारी विविध खात्याकडून आलेल्या मागणीची छाननी करुन योग्य ते आदेश पारीत करतील. |
| **१२)** | **रुग्णालय व्यवस्था** | संस्थानमार्फत दोन ठिकाणी चोवीस तास प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात येतील. तसेच सुसज्ज अशी रुग्णवाहिका मंदिर परिसरात ठेवण्यात येईल. |
| **१३)** | **पाणीपुरवठा** | पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल.<br>नियमित पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात येईल. |
| **१४)** | **भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था** | संस्थानाचे साईप्रसाद नं. १ व नं. २,साईऊदयान, मंगलकार्यालय, द्वारावती,भक्तनिवासस्थान, इ. इमारतीमधून तसेच साईनगर, साईप्रसाद निवासस्थान व न.भ.निवासस्थान परिसरात स्वतंत्र मंडप टाकून पालखी पदयात्रींसाठी व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल. उत्सवात समाधी मंदिर परिसर व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने व कलाकारांसाठी स्टेज इ. व मंडपही टाकावयाचे आहेत. आवश्यकतेनंसार व गरजेनुसार त्यात वाढ करावी लागेल. |

| | | |
|---|---|---|
| **१५)** | **पालखी व्यवस्था** | श्री गुरुपौर्णिमा उत्सवात पुणे तसेच इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था मंगल कार्यालय, साईउद्यान, परिसरात करण्यात येते व पालखी सोबत येणा-या भक्तांची व्यवस्था मंगलकार्यालय, साईउद्यान, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय, इ. इमारतीत तसेच साईनगर मैदानात, जुन्या प्रसादालयचे, न.भ.निवासाचे मोकळ्या जागेत मंडप/ शामियाने इ.मध्ये करण्यात येते. या वर्षीही नेहमीप्रमाणे ती व्यवस्था करण्यात येईल. येणा-या पालख्यांचा तक्ता अलहिदा सादर केला जाईल. यावर्षी कडक उन्हाळा असल्याने पायी येणा-या भक्तांची आवश्यकतेनुसार शिंगवे, गुहापाट, पिंप्री निर्मळ येथे संस्थानतर्फे टँकरने पिण्याचे पाणी पुरविण्याची व्यवस्था यंदाही करावी लागणार आहे. |
| **१६)** | **कार्यक्रमाची सांगता** | गोपाळ काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निर्मंत्रित कीर्तनकार करतील. |
| **१७)** | **खर्चाचे अंदाज पत्रक** | श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०११ मध्ये प्रत्यक्ष खर्च रुपये **४१,३८,७३४/-**/-(अक्षरी **रु. एकेचाळीस लाख अडवतीस हजार सातशे चौतीस** मात्र) इतका खर्च झाला होता. श्री गुरुपौर्णिमा उत्सव सन २०१२ करीता खालील तपशिलाप्रमाणे अंदाजे रुपये **४५,१८,४०१/-** (अक्षरी **रु. पंचेचाळीस लाख आठरा हजार चारशे एक मात्र)** खर्च अपेक्षीत आहे. |

तरी उपरोक्त प्रमाणे श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१२ साजरा करणेस, त्यासाठी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रुपये ४५,१८,४०१/- (अक्षरी रु. पंचेचाळीस लाख आठरा हजार चारशे एक मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१२ साजरा करणेस व याकामी येणारे अंदाजे रुपये ४५,१८,४०१/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-सामान्य प्रशासन,वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **साईआश्रम - १ व साईआश्रम - २ या इमारतीचे खोल्या/ हॉलचे नंबर प्लेट बनविणे कामी आलेले कोटेशन उघडणे बाबत.**

**प्रस्ताव** साईआश्रम- १ व साईआश्रम- २ या इमारतीचे खोल्या / हॉलचे दरवाजावर ॲल्युमिनियम सिट मध्ये (साईज लांबी ५ इंच x रुंदी २.५ इंच ) फ्रोस्टिंग स्क्रु फिटींगसह १७२८ नग नंबर प्लेट तयार करुन बसवुन घेणेकामी रु. २,१६,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख सोळा हजार मात्र) चे अपेक्षित खर्चास दिनांक २८/०४/२०१२ रोजीचे मा. त्रीसदस्य समितीचे सभेत प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

नंबर प्लेट बनविणा-या पुणे, नाशिक व स्थानिक फर्म कडुन संदर्भ क्रं.२ अन्वये ६ फर्मना पत्र देऊन नमुन्यासह कोटेशनची मागणी केलेली होती.

सदरचे कोटेशन भरुन पाठविणेची मुदत दि. ३०/०४/२०१२ अखेर पर्यंत देण्यात आलेली होती. ०६ फर्म पैकी मुदतीत ०५ कोटेशन नंबर प्लेटचे नमुन्यासह आलेली असुन त्याचा तपशील खालील प्रमाणे. तसेच मे. एस. डी. पटवा, पुणे यांनी कोटेशन सादर केलेले नाही.

| अ.नं. | फर्मचे नाव | प्राप्त कोटेशन स्थिती | आवक नंबर / दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | मे. हेमंत आर्टस्, शिर्डी. | बंद पाकीट | १४२८ / दि.३०/०४/२०१२ |
| ०२ | कल्याणी ग्राफीक्स, शिर्डी. | बंद पाकीट | १४३२ / दि.३०/०४/२०१२ |
| ०३ | सोमवंशी एम. जी.,राहता. | बंद पाकीट | १४३३ / दि.३०/०४/२०१२ |
| ०४ | मे. ॲडव्हयु ॲडव्हरटाईझिंग प्रा.लि.नाशिक. | बंद पाकीट | १४३४ / दि.३०/०४/२०१२ |
| ०५ | स्वस्तिक इन् डिझाईन, शिर्डी. | बंद पाकीट | १४३५ / दि.३०/०४/२०१२ |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन आजचे सभेत समक्ष उघडून निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात येऊन त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,द्वारावती)

---

वरील निर्णय क्र. ३९३ ते ३९७सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (किशोर मोरे) | (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी